डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र.बार्टी/पुणे/योजना विभाग/IBPS(०७)/२०२३-२४ | १८७६ दि. २५/०२/२०२४

## Shortfall Documents Notification

Tender ID: 2023_SJASA_933776_1

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्याकडून अनुसूचित जातीतील मांग, मातंग, मिनिमादिगा, दखनी मांग, मांग- म्हशी, मदारी गारूडी, राधे मांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी प्रवर्गातील युवक युवतींकरिता बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. व तत्सम लिपीक वर्गीय पदाच्या स्पर्धा पूर्व निवासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील नागपूर जिल्ह्यामध्ये प्रशिक्षण संस्थांची निवड करण्याकरिता दि.०९/०८/२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in व http://barti.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे तांत्रिक मूल्यामापन करताना असे आढळून आले की, निविदाधारकांनी तांत्रिक लिफाफ्यातील निकषांच्या आवश्यकतेनुसार कमी/अपूर्ण कागदपत्रे सादर केली आहेत. म्हणून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दि.१७/०९/२०१९ रोजी नुसार तांत्रिक समितीने खालील तपशिलानुसार कागदपत्रे ऑनलाईन सादर करण्यासाठी खालील निविदा धारकांना सूचित करण्याचा निर्णय घेतला आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | कमी/अपूर्ण कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | प्रज्ञा प्रबोधिनी करीअर अकॅडमी | १. संस्थेचे/फर्मचे नाव काळ्या यादीत नसल्याबाबतचे हमीपत्र जोडावे.<br>२. वसतीगृहामध्ये स्वच्छ स्वयंपाकगृह व स्वतंत्र भोजनगृहामध्ये भोजन व चहा-नाश्ताची व्यवस्था असल्याबाबत छायाचित्र व पुरावे जोडावे. |
| २. | प्रिमिअर अकॅडमी सोसायटी. | १. परिशिष्ट 'ब' मध्ये निवेदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे पंजीबध्द हमीपत्र जोडावे.<br>२. मागील पाच वर्षातील केवळ बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. मध्ये नोकरीच्या संधी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची यादी, नियुक्ती पत्र, प्रवेश अर्ज जोडावे.<br>३. मुला-मुलींसाठी असलेल्या स्वतंत्र वसतीगृहामध्ये किमान किती विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था आहे याबाबत पुरावे जोडावे.<br>४. वसतीगृहामध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा,अग्नीशामक यंत्रणा तसेच गृहपाल व सुरक्षारक्षक असलेबाबतचे पुरावे जोडावे.<br>५. विद्युत बॅकअपसह संगणक लॅब मध्ये उपलब्ध असलेले संगणक संख्या, ऑनलाईन टेस्ट सिरीज, याबाबत पुरावे तसेच छायाचित्रे जोडावे. |

| | | |
|---|---|---|
| ३. | स्व. कुसुमताई दळवी बहूउद्देशीय संस्था द्वारा संचलित तक्षशिला अकॅडमी | १. प्रशिक्षण संस्था तसेच वसतीगृहाचा पत्ता नमूद असलेला नूतनीकृत भाडेकरारनामा जोडावा.<br>२. वसतीगृहामध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा असलेबाबतचे पुरावे जोडावे.<br>३. प्रशिक्षण केंद्रावर कार्यरत असलेल्या तज्ञ व्याख्यात्यांची यादी, मानधन पत्र, ऑफर लेटर, शैक्षणिक पात्रता (प्रमाणपत्रांच्या प्रतीसह) व अनुभवपत्र जोडावे.<br>४. सन २०१७-२०२० चे लेखापरीक्षण अहवाल व वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र जोडावे.<br>५. शासकीय यंत्रणा/ विभाग यांचे सोबतचे कार्यरंभ आदेश/सामंजस्य करार झाला असल्यास जोडावे |
| ४. | श्री. जी. बहुउद्देशीय संस्था | १. संस्थेचे पॅन कार्ड तसेच वस्तु व सेवा कर GST नोंदणी प्रमाणपत्र जोडावे.<br>२. संस्थेचे/फर्मचे नाव काळ्या यादीत नसल्याबाबतचे हमीपत्र जोडावे.<br>३. प्रशिक्षण केंद्रावर कार्यरत असलेल्या तज्ञ व्याख्यात्यांची यादी, मानधन पत्र, ऑफर लेटर, शैक्षणिक पात्रता (प्रमाणपत्रांच्या प्रतीसह) व अनुभवपत्र जोडावे.<br>४. मुला-मुलींसाठी स्वतंत्र निवास व्यवस्था असलेल्या वसतिगृहामध्ये हवेशीर दारे खिडक्या, स्वतंत्र गाद्या, कॉट,बेडशीट ब्लँकेट, कपाटाची सोय, स्वच्छता गृह, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, खोलीत स्टडी टेबलची व्यवस्था स्वच्छ स्वयंपाकगृह व स्वतंत्र भोजनगृहामध्ये भोजन व चहा-नाश्ताची व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. तसेच अग्नीशामक यंत्रणा असल्याबाबत छायाचित्र व पुरावे जोडावे.<br>५. मागील पाच वर्षातील केवळ बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. मध्ये नोकरीच्या संधी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची यादी, नियुक्ती पत्र, प्रवेश अर्ज जोडावे.<br>६. प्रशिक्षण केंद्राचे वेबपेज, वेबसाईट तसेच वाय फाय सुविधा असलेबाबत पुरावे जोडावे.<br>७. प्रशिक्षण केंद्राचे स्वतंत्र ग्रंथालय व त्यामध्ये उपलब्ध असलेल्या पुस्तकांचे पुरावे जोडावे.<br>८. प्रशिक्षण केंद्राचे स्वतंत्र वातानुकुलीत अभ्यासिका असल्याबाबत छायाचित्रे तसेच किमान किती विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था आहे याबाबत पुरावे जोडावे.<br>९. प्रशिक्षण केंद्राचे स्वतंत्र कार्यालय, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा व आधार संलग्न बायोमेट्रिक सुविधा याबाबत पुरावे जोडावे. |

| | | |
|---|---|---|
| | | १०. प्रशिक्षण केंद्राचे स्वत:चे स्वतंत्र Anroid आणि IOS मोबाईल ॲप (संबंधित प्रशिक्षण सुविधांसह)डिजिटल स्टुडिओ, विद्युत बॅकअपसह संगणक लॅब मध्ये उपलब्ध असलेले संगणक संख्या, ऑनलाईन टेस्ट सिरीज, याबाबत पुरावे तसेच छायाचित्रे जोडावे.<br>११. संस्था प्रमुख/संस्थेचे अध्यक्ष/सचिव/सदस्य अनुसूचित जातीतील असल्यास वैधता प्रमाणपत्र/जात प्रमाणपत्र जोडावे. |

उपरोक्त नमूद ई-निविदा धारकांनी तक्त्यात नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे योग्य स्वरुपात व सुस्पष्ट दस्त ऑनलाईन पोर्टल https://mahatenders.gov.in वर दि.२८/०२/२०२४ रोजी दु.१२.०० पर्यंत सादर करावी. सदर मुदतीनंतर कमी/अपूर्ण कागदपत्रे सादर करण्यासाठी अन्य कोणत्याही संधीचा अथवा वाढीव मुदतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

२६/२/२४.

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने**

**(डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण)**
**विभाग प्रमुख**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**